



अर्कादी गैदार

# दोन भाऊ



डा. अमित

अर्कादी गैदार

# दोन भाऊ

प्रगती प्रकाशन

मॉस्को

अनुवाद : अनिल हवालदार
सजावट आणि चित्रे : दाविद दूबिन्स्की

Аркадий Гайдар

ЧУК И ГЕК

*На языке маратхи*

Перевод сделан по книге:
А. Гайдар, М., «Детская
литература», 1973.

© मराठी अनुवाद, प्रगती प्रकाशन, १९८०

सोविएत संघात मुद्रित

Г $\frac{70802-790}{014(01)-80}$ 765-80

4803010102



कोणे एके काळी, निळया डोंगरांजवळच्या जंगलात एक माणूस रहात होता. तो खूप काम करीत असे, पण तरीही बरेच काम करायचे नेहमी शिल्लक रहात असे आणि सुटी घेऊन आपल्या घरी जाणे काही त्याला जमेना.

अखेरीस जेव्हा हिवाळा आला, तेव्हा त्याला कमालीचे एकाकी वाटू लागले. म्हणून त्याने आपल्या बायकोला पत्र

लिहिले की, आपल्या दोन्ही मुलांसह तिने त्याला येऊन भेटावे.

त्याला दोन मुले होती: चुक आणि गेक.

ती आपल्या आईबरोबर खूप खूप दूरच्या एका फार मोठ्या शहरात रहात होती. सबंध जगात तेवढे सुंदर शहर कुठेही नव्हते.

या शहरातल्या मनोऱ्यांच्या टोकांवर दिवसरात्र लाल तारे चमकत होते.

आणि अर्थातच त्या शहराचे नांव मॉस्को होते.

* * *

पत्र घेऊन पोस्टमन जिना चढत होता त्यावेळी चुक आणि गेक मारामारी करण्यात दंग होते. आणि त्यांची चांगलीच जुंपली होती.

ते कशाबद्दल भांडत होते ते मला आता काही आठवत नाही. मला असे वाटते की, चुकने गेकची काड्यापेटी घेतली होती – किंवा कदाचित चुकची बुटाच्या पॉलिशची रिकामी डबी गेकने पळवली होती.

दोघा भावांनी एकेकदा एकमेकांना मस्त ठोसे लगावले होते आणि पुन्हा गुद्दे हाणण्याच्या बेतात असतानाच दारावरची घंटा वाजली. दोघांनी चमकून एकमेकांकडे पाहिले. त्यांना वाटले आई आली. आणि त्यांची आई इतरांच्या आयांसारखी नव्हती. त्यांनी मारामारी केल्याबद्दल ती कधीही त्यांना रागावत नसे किंवा





त्यांच्यावर ओरडत नसे. ती त्या बदमाशांना वेगवेगळ्या खोल्यांमध्ये बंद करी व तिथे अख्खा तास किंवा काही वेळा दोन तास कोंडून घाली आणि त्यांना एकत्र खेळू देत नसे.

आणि एक तास म्हणजे – टिक्टॉक् – अख्खी साठ मिनिटे असत. दोन तासांमध्ये तर त्याहून जास्त असत.

म्हणून त्या मुलांनी पटकन आपले अश्रू पुसले व दार उघडायला ती धावली.

पण दारात त्यांची आई नव्हतीच मुळी. तिथे पत्र घेऊन पोस्टमन उभा होता.

"बाबांचं पत्र!" ते ओरडले. "हुर्रे! बाबांचं पत्र! नक्कीच ते लौकर येणार असले पाहिजेत!"

आणि आनंदाच्या भरात ते खिदळू लागले, सोफ्यावर नाचायला व कोलांट्या उड्या मारायला त्यांनी सुरुवात केली. याचे कारण, मॉस्को हे जरी जगातले सर्वांत अद्भुतरम्य शहर असले, तरी अख्खे एक वर्षभर बाबा लांब असताना, मॉस्कोतसुद्धा कंटाळा यायचा.

ते एवढे उत्तेजित झाले होते व आनंदात होते की, आई केव्हा आत आली हेही त्यांना समजले नाही.

आपली दोन गोजिरवाणी मुले उताणी पडून किंचाळत आहेत व आपल्या टाचांनी भिंतीवर दणादणा आवाज करीत आहेत हे पाहून खरे म्हणजे तिच्या आश्चर्याला पारावार उरला नव्हता; ते दोघे एवढ्या जोरजोराने पाय आपटीत होते की, सोफ्यावरची चित्रे थरथरत होती आणि घड्याळातल्या स्प्रिंग वाजत होत्या.

पण त्यांच्या आनंदाचे कारण जेव्हा आईला समजले तेव्हा तिने आपल्या मुलांना रागाने दटावले नाही.

उलट तिने त्यांना सोफ्यावरून पळवून लावले, आपल्या अंगातला केसाळ कोट पटकन उतरवला आणि आपल्या डोक्यावरच्या केसात अडकलेले हिमकण झटकण्याची तसदीही न घेता तिने त्या पत्रावर झडप घातली; तिच्या केसातले हिमकण एव्हाना वितळले होते आणि तिच्या काळ्याशार भुवयांवर मण्यांसारखे चमकत होते.

* * *

प्रत्येकाला माहीत आहे की, पत्रे आनंदाची वार्ता देतात तशी वाईट बातमीही आणतात. म्हणून आई पत्र वाचत असताना चुक आणि गेक अगदी एकटक तिच्या चेहऱ्याकडे पहात राहिले होते.





प्रथम तिच्या कपाळाला आठ्या पडल्या, तशी त्यांच्याही कपाळावर आठ्या उमटल्या. मग तिच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. याचा अर्थ पत्राने आनंदाची वार्ता आणली होती.

पत्र बाजूला ठेवीत ती म्हणाली, "तुमचे बाबा काही येत नाहीत. त्यांना खूप काम आहे आणि म्हणून त्यांना घरी यायला जमणार नाही."

चुक आणि गेकने एकमेकांकडे गोंधळल्या नजरेने पाहिले. पत्राने अगदी वाईटातली वाईट बातमी आणली होती.

दुसऱ्याच क्षणी त्यांनी ओठांना मुरड घालून फिस्कारत

आईकडे रागारागाने पाहयाला सुरुवात केली, कारण ती मिस्कील हसत होती. पण का हसत होती ते मात्र त्यांना समजत नव्हते.

"ते येत नाहीत," आईने आपले बोलणे पुढे चालू ठेवले, "पण ते म्हणतात की आपण त्यांच्याकडं जाऊन त्यांना भेटावं."

हे ऐकल्यासरशी चुक आणि गेकने सोफ्यावरून दणादण उड्या मारल्या.

"चमत्कारीक माणूस आहे!" आई सुस्कारा टाकीत स्वत:शीच म्हणाली. "म्हणायला सोपं आहे – 'या आणि भेटा' – जणू काही ट्राममध्ये बसायचं आणि जायचं!"

"अर्थातच!" चुक पटकन म्हणाला. "जर ते 'या' असं म्हणतात तर आपण ट्राममध्ये बसून गेलं पाहिजे."

"काय वेडा मुलगा आहेस रे," आई म्हणाली. "तिथं जायला प्रथम तुला हजार किलोमीटर आगगाडीतून गेलं पाहिजे, मग आणखी एक हजार किलोमीटर. आणि त्यानंतर घसरगाडीत बसून तैंगामधून प्रवास केला पाहिजे. आणि तिथं तैंगात लांडगा किंवा अस्वल हमखास आडवं येतं. अरे देवा, कल्पना केली तरी काळजात धडकी भरते!"

पण जाण्याबाबतच्या कल्पनेवर पाणी सोडायला चुक आणि गेक क्षणभरही तयार नव्हते. ते म्हणाले की, एक हजारच काय, पण शंभर हजार किलोमीटर प्रवास करायला ते तयार होते. त्यांना कशाचीही भीती वाटत नव्हती. ते शूर होते. अगदी कालच त्यांनी रस्त्यावरच्या एका पिसाळलेल्या कुत्र्याला दगड मारून कुंपणाबाहेर हाकलून लावले नव्हते का?



काहीही न करता अगदी गप्प बसून आई जेव्हा त्यांचे बोलणे ऐकत होती तेव्हा ते दोघे सतत बडबड करीत होते, हातवारे करीत होते, पाय आपटीत होते व उड्या मारीत होते. मग एकाएकी ती खदखदा हसत सुटली, आपल्या बाहुपाशात तिने त्या दोघांना घट्ट आवळून धरले, त्यांना गरगरा फिरविले आणि अखेरीस धुडुम्‌दिशी सोफ्यावर टाकले.

तुम्हाला गुपित सांगायचे म्हणजे अशा पत्राची ती खूप दिवसांपासून वाट पहात होती. आता ती चुक आणि गेकला केवळ चिडवीत होती कारण तिला गंमत करायला आवडायची.

* * *

त्यांच्या प्रवासाची तयारी करायला आईला एक आठवडा लागला. दरम्यान चुक आणि गेकने मुळीच वेळ दवडला नाही. स्वैपाकघरातला चाकू घेऊन चुकने स्वत:साठी कट्यार बनवली, तर गेकने एक गुळगुळीत काठी शोधून काढली, तिच्या टोकाला एक खिळा ठोकला आणि काय आश्चर्य! त्याच्याजवळ असा भक्कम भाला तयार झाला की, अस्वलाच्या काळजात त्याने तो खुपसायचा अवकाश, जागच्याजागी ते ठार झाले असते, मात्र आधी कुणीतरी अस्वलाच्या कातडीत भोसकायला पाहिजे होते!

अखेरीस सर्व काही तयारी झाली. सामानाची बांधाबांध झाली. दाराला दुहेरी कुलूप बसवले. उंदरांचा सुळसुळाट घरात होऊ नये म्हणून पावाचे तुकडे, पिठाचे कण आणि कडधान्यांचे दाणे कपाटामधून झाडून साफ केले. त्यानंतर, दुसऱ्या दिवशी

जाणाऱ्या आगगाडीची तिकीटे विकत आणण्यासाठी आई रेल्वे स्टेशनावर गेली.

ती जेव्हा बाहेर गेली होती तेव्हा चुक आणि गेकचे घरात भांडण जुंपले.

अरेरे! या भांडणामुळे पुढे काय काय निस्तरावे लागणार आहे याची जर त्यांना त्यावेळी आधीच कल्पना असती, तर त्या दिवशी ते तसे वागले नसते.

* * *

चुकचा स्वभाव थोडा काटकसरी होता. एका चपटचा पत्र्याच्या डबीत त्याने चहाच्या पुडचांमधले चांदीचे कागद आणि चॉकलेट–गोळयांचे वरचे कागद जमवून ठेवले होते. तसेच बाणांसाठी काही पक्ष्यांची काळी पिसे, चिनी जादू करण्यासाठी काही घोडचाचे केस आणि अशाच काही महत्त्वाच्या वस्तू त्याने डबीत झाकून ठेवल्या होत्या.

गेकजवळ अशी डबी नव्हती. तसा गेक थोडा वेंधळा होता, पण तो गाणी मात्र सुरेख म्हणायचा.

आत्ता काय घडले की, स्वैंपाकघरात बसून चुक आपल्या मौल्यवान डबीतला खजिना पसरून त्यातल्या वस्तू वेगवेगळया काढीत होता आणि गेक दुसऱ्या खोलीत गाणी म्हणत बसला होता, तोच पोस्टमन आला आणि त्याने आईच्या नांवे आलेली तार चुकच्या हाती दिली.

चुकने तारेचा कागद आपल्या डबीत ठेवला आणि गेक



गाणे म्हणायचा का थांबला ते पाहण्यासाठी तो बाहेरच्या खोलीत गेला.

"हिप् हिप् हुर्रे!" गेक ओरडत होता. "हा बघ हाणला! टर्र्र्र खचाक्!"

कुतूहलाने चुकने दार हळूच उघडून पाहिले आणि ते "टर्र्र्र खचाक्" पाहताच त्याचे हात रागाने शिवशिवू लागले.

खोलीच्या मध्यावर एक खुर्ची ठेवलेली होती आणि तिच्या पाठीशी टांगलेले वर्तमानपत्र भाल्याने भोसकून चिंध्या झालेले होते. हे एवढेच असते तर काही बिघडले नसते, पण आईच्या बुटांचा पिवळया रंगाचा कार्डबोर्डाचा खोका म्हणजे अस्वल आहे अशा कल्पनेने गेक घाबरला होता आणि अंगातले सारे बळ एकवटून त्या अस्वलाला तो आपल्या भाल्याने भोसकत होता. आणि नेमक्या त्याच खोक्यात चुकने आपली पत्र्याची पिपाणी, सात नोव्हेंबरच्या सणाच्या रंगीबेरंगी तीन फिती आणि ४६ कोपेकची नाणी जमवून ठेवली होती. गेकप्रमाणे पैसे उधळून न टाकता त्याने ते दूरच्या प्रवासासाठी राखून ठेवले होते.

चेंदामेंदा झालेला कार्डबोर्डाचा खोका पाहताच चुकने गेकच्या हातून भाला हिसकावून घेतला, गुडघ्यावर आडवा धरून काडकन् मोडला आणि त्याचे तुकडे तुकडे करून त्याने फरशीवर फेकून दिले.

पण एखाद्या बहिरीससाण्यासारखी गेकने चुकवर झडप घातली, त्याच्या हातून पत्र्याची डबी खेचून घेतली आणि खिडकीच्या तावदानाशी उडी घेऊन ती डबी खिडकीबाहेर भिरकावून दिली.

चुक कमालीचा संतापला. "तार! तार!" अशा कानठळ्या बसवणाऱ्या आरोळ्या ठोकीत तो घराबाहेर धावला: बाहेर कडाक्याचा गारठा आहे, तेव्हा डोक्यावर टोपी घातली पाहिजे हेसुद्धा तो विसरला.

काहीतरी चुकले आहे याची गेकलाही जाणीव झाली आणि तोसुद्धा लगबगीने चुकपाठोपाठ बाहेर धावला.





न उलगडलेला तारेचा कागद ठेवलेली ती पत्र्याची डबी त्यांनी शोध शोध शोधली. पण व्यर्थ!

एक तर ती बर्फाच्या खड्डयात खोलवर गाडली गेली होती किंवा रस्त्यावर कुणी जाता जाता ती डबी उचलून नेली होती. काही झाले तरी तो तारेचा बंद लिफाफा व चुकचा सगळा खजिना सामावलेली पत्र्याची डबी आता कायमची हरवली होती.

* * *

चुक आणि गेक घरात खूप वेळ गप्प बसून राहिले. दोघांनीही आपसातले भांडण आता मिटवले होते, कारण याबद्दल यावेळी

आईकडून चांगलाच चोप मिळणार याची त्यांना जाणीव होती. गेकपेक्षा चुक अख्ख्या एका वर्षाने वडील होता, म्हणून शिक्षेचा मोठा वाटा आपल्याकडे येईल अशी धास्ती चुकच्या मनात होती व तो खूप विचार करीत होता.

"गेक, आपण असं केलं तर? त्या तारेबद्दल आपण आईला अजिबात सांगितलंच नाही तर? नाही तरी तारेचं एवढं काय लागून गेलंय? तिच्याशिवायही आपण खूप गंमत करू शकू!"

"खोटं बोलून चालणार नाही," उसासा टाकीत गेक म्हणाला: "तू खोटं बोलतोस तेव्हा आईला फार राग येतो."

"पण आपल्याला खोटं बोलावंच लागणार नाही", चुक आनंदाने उद्‌गारला. "जर तिनं विचारलं: 'तार कुठं आहे?' तर आपण तिला सांगू. पण समज, जर तिनं विचारलंच नाही, तर आपण कशाला उगीच विषय उकरून काढायचा? आपण काही आगाऊ नाही."

"ठीक आहे," गेकने मान्यता दिली. "जर आपल्याला खोटं बोलावं लागणार नसेल, तर तू म्हणतोस तसं आपण करू. ही कल्पना मोठी मस्त आहे हं, चुक."

या विषयाबाबत त्या दोघांनी निर्णय पक्का केला न केला तोच आई परत आली. ती खूप खूष दिसत होती, कारण तिला आगगाडीमधल्या चांगल्या जागांची तिकीटे मिळाली होती. पण आपल्या लाडक्या मुलांचे चेहरे गंभीर झालेत आणि त्यांच्या डोळ्यांच्या कडा ओल्या आहेत ही गोष्ट तिच्या नजरेतून सुटली नाही.





"माझ्या सोनुल्यांनो," आपल्या कोटावरचा बर्फ झटकून टाकीत ती म्हणाली, "आज कशाबद्दल मारामारी केलीत?"

"आज आम्ही मुळीच मारामारी केली नाही," चुक म्हणाला.

"खरंच आज मारामारी केली नाही," गेकने दुजोरा दिला, "आम्ही मारामारी करणार होतो, पण न करणं चांगलं असं आम्हाला वाटलं".

"असलं वागणं मला खूप आवडतं," आई म्हणाली. तिने अंगातला कोट काढला, ती सोफावर बसली आणि हिरव्या रंगाची कडक तिकीटे तिने त्यांना दाखवली—एक मोठ्ठं आणि दोन छोटी.

आईकडून चांगलाच चोप मिळणार याची त्यांना जाणीव होती. गेकपेक्षा चुक अख्ख्या एका वर्षाने वडील होता, म्हणून शिक्षेचा मोठा वाटा आपल्याकडे येईल अशी धास्ती चुकच्या मनात होती व तो खूप विचार करीत होता.

"गेक, आपण असं केलं तर? त्या तारेबद्दल आपण आईला अजिबात सांगितलंच नाही तर? नाही तरी तारेचं एवढं काय लागून गेलंय? तिच्याशिवायही आपण खूप गंमत करू शकू!"

"खोटं बोलून चालणार नाही," उसासा टाकीत गेक म्हणाला: "तू खोटं बोलतोस तेव्हा आईला फार राग येतो."

"पण आपल्याला खोटं बोलावंच लागणार नाही", चुक आनंदाने उद्गारला. "जर तिनं विचारलं: 'तार कुठं आहे?' तर आपण तिला सांगू. पण समज, जर तिनं विचारलंच नाही, तर आपण कशाला उगीच विषय उकरून काढायचा? आपण काही आगाऊ नाही."

"ठीक आहे," गेकने मान्यता दिली. "जर आपल्याला खोटं बोलावं लागणार नसेल, तर तू म्हणतोस तसं आपण करू. ही कल्पना मोठी मस्त आहे हं, चुक."

या विषयाबाबत त्या दोघांनी निर्णय पक्का केला न केला तोच आई परत आली. ती खूप खूष दिसत होती, कारण तिला आगगाडीमधल्या चांगल्या जागांची तिकीटे मिळाली होती. पण आपल्या लाडक्या मुलांचे चेहरे गंभीर झालेत आणि त्यांच्या डोळ्यांच्या कडा ओल्या आहेत ही गोष्ट तिच्या नजरेतून सुटली नाही.





"माझ्या सोनुल्यांनो," आपल्या कोटावरचा बर्फ झटकून टाकीत ती म्हणाली, "आज कशाबद्दल मारामारी केलीत?"

"आज आम्ही मुळीच मारामारी केली नाही," चुक म्हणाला.

"खरंच आज मारामारी केली नाही," गेकने दुजोरा दिला, "आम्ही मारामारी करणार होतो, पण न करणं चांगलं असं आम्हाला वाटलं".

"असलं वागणं मला खूप आवडतं," आई म्हणाली. तिने अंगातला कोट काढला, ती सोफावर बसली आणि हिरव्या रंगाची कडक तिकीटे तिने त्यांना दाखवली—एक मोठं आणि दोन छोटी.

लौकरच त्यांची संध्याकाळची जेवणे उरकली. मग गडबड थांबली, दिवे मालवले गेले आणि ती सारी झोपली.

आईला तारेबद्दल काहीच माहिती नव्हती, त्यामुळे साहजिकच तिने मुलांना त्याबद्दल काहीच विचारले नाही.

* * *

दुसऱ्या दिवशी ते निघाले. पण आगगाडी संध्याकाळी खूप उशिरा स्टेशनातून सुटल्याने खिडक्या काळ्याकुट्ट होत्या व चुक आणि गेकला गंमतीदार असे काहीच पहायला मिळाले नाही.

रात्री गेक मध्येच झोपेतून उठला. त्याला जोराची तहान लागली होती. छतावरचा छोटा दिवा जरी विझवला होता, तरी गेकभोवतालच्या सर्व गोष्टी निळसर प्रकाशात न्हाऊन निघाल्या होत्या. टेबलावरच्या पांढऱ्या कापडावरचा गडू खालीवर नाचत होता, नारिंगी रंगाचे संत्रे आता हिरवे दिसत होते आणि आई गाढ झोपली होती.

खिडकीच्या तावदानांवर हिमकण साचले होते व त्यांच्यामधून प्रचंड वाटोळा चंद्र दिसत होता. हा चंद्र मॉस्कोतल्या चंद्रापेक्षा वेगळा होता. आगगाडी आता उंच डोंगरांमधून वेगाने जात असली पाहिजे, म्हणून चंद्र एवढा जवळून दिसतोय अशी गेकची मनोमन खात्री झाली.

त्याने आईला जागे केले आणि प्यायला पाणी मागितले. पण अशा भलत्या वेळी त्याला पाणी प्यायला देण्यास तिने नकार



दिला व त्याऐवजी संत्र्याची एक फोड खाण्यास तिने त्याला सांगितले.

गेक रुसला पण तरी त्याने संत्रे फोडले. आता त्याला मुळीच झोपावेसे वाटत नव्हते. चुक जागा व्हावा म्हणून त्याने त्याला हलविले. चुक झोपेतच रागाने कुरकुरला आणि परत गाढ झोपी गेला.


गेकने मग आपले नमदी बूट पायात चढवले, दार उघडले व बाहेरच्या कॉरिडोअरमध्ये तो गेला.

कॉरिडोअर लांबलचक आणि अरुंद होता. भिंतीलगत आसने बसवलेली होती आणि त्या आसनांवर बसून तुम्ही उठताच दाणकन् आपटून ती मिटत असत. कॉरिडोअरमध्ये आणखी दहा दरवाजे होते. त्यांचा रंग चकचकीत लाल होता व त्यांच्या पितळी मुठी चमकत होत्या.

गेक एका आसनावर बसला, मग दुसऱ्यावर, मग तिसऱ्यावर आणि अशा प्रकारे डब्याच्या दुसऱ्या टोकापर्यंत तो बसत गेला. पण त्याचवेळी हातात दिवा घेऊन पोर्टर आला आणि लोक झोपले असताना मोठमोठ्याने खुर्च्या आपटल्याबद्दल त्याने गेकची कानउघाडणी केली.

पोर्टर निघून जाताच गेक घाईघाईने आपल्या कंपार्टमेंटमध्ये परतला. त्याने मोठ्या प्रयत्नाने दरवाजा उघडला, मग आई जागी होऊ नये म्हणून पुन्हा काळजीपूर्वक तो बंद केला आणि मऊ बिछान्यात उडी घेतली.

सबंध बिछाना चुकने अडवला आहे असे आढळताच गेकने त्याला बाजूला सारण्यासाठी ढुशी मारली.




पण भलतेच घडले! गुबगुबीत गालाच्या आणि सोनेरी केसाच्या चुकऐवजी एका मिशाळ माणसाचा रागीट चेहरा गेकच्या दृष्टीस पडला! तो त्याच्यावर डोळे वटारून गुरगुरला:

"कोण मला रेटतंय?"

गेकने एवढ्या मोठ्यांदा किंचाळी फोडली की, सारे प्रवासी एकदम दचकून जागे झाले. पटकन दिवा लावण्यात आला आणि आपण चुकून दुसऱ्याच कंपार्टमेंटमध्ये गेलो आहोत असे गेकच्या लक्षात येताच तो अधिकच मोठ्यांदा गळा काढून रडू लागला.





प्रत्यक्षात काय घडले हे जेव्हा त्यांना समजले, तेव्हा प्रत्येकजण हसू लागला. त्या मिशाळ माणसाने अंगात कपडे घातले व गेकला त्याच्या कंपार्टमेंटकडे तो घेऊन आला.

गेक त्याच्या पांघरूणात शिरला आणि शांतपणे झोपला. आगगाडी हलत होती, वारा घोंघावत होता.

तो विचित्र, भला मोठा चंद्र पुन्हा एकदा त्या नाचणाऱ्या गडूवर आपला निळसर मंद प्रकाश पाडीत होता. त्या टेबलावरच्या पांढऱ्या कापडावर पडलेल्या गडद पिवळ्या संत्र्यावर, आईच्या चेहऱ्यावर आपला निळसर प्रकाश पाडीत होता. आई झोपेतच हसत होती, आपल्या मुलाच्या दैनावस्थेची तिला अजिबात कल्पना नव्हती.


अखेरीस गेकलाही झोप लागली...

आणि त्याला अत्यंत<br>चमत्कारिक स्वप्न



पडले : आगगाडी गदगदा
हलत होती; असे भासत
होते की, सर्वत्र आवाज
ऐकू येत होते – प्रत्येक

चाक आपल्या बडबडीने
वातावरण भरून टाकीत



होते. इंजिनाच्या मोठ्या
आवाजातल्या पालुपदामध्ये
वेगाने धावणारे डबे
आपला आवाज मिसळवीत
होते.

**पहिला :**

चला मित्रांनो पुढे चला! रात्र काळी असू दे,
आपुल्या मार्गे पाऊल पुढेच पडू दे!



**दुसरा :**

अरे इंजिनाच्या दिव्या, दूरवर पाड प्रकाश तेजस्वी,
पहाटेच्या अजोड ताऱ्याशी स्पर्धा कर यशस्वी.

**तिसरा :**

ज्वालांनो, उंच उसळा, शिट्टी सणाणून घुमू दे.
चाकांनो, प्राचीच्या दिशेला विजेसारखी दौड चालू दे.

**चौथा :**

चढून जाऊ जेव्हा डोंगर निळे
प्रवासाच्या अखेरी गप्प होऊ सगळे.

* * *

गेक जागा झाला तेव्हा चाके बोलायची थांबली होती. त्यांच्या एका तालात पायाखाली खडखडाट ऐकू येत होता. हिमथिजल्या खिडकीमधून सूर्याचे किरण डोकावत होते. बिछाने गुंडाळले गेले होते. चुकने तोंड धुवून दात घासले होते व तो



सफरचंद खात बसला होता. तर उघड्या दाराशी तो लष्करातला मिशाळ माणूस व आई उभे होते आणि गेकच्या रात्रीच्या प्रतापांना हसत होते. त्या लष्करातल्या माणसाने दिलेली पेन्सिल चुकने गेकला दाखवली. पिवळ्या काडतुसापासून बनवलेले टोपण तिला बसवलेले होते.

पण गेकला त्याचा मत्सर वाटला नाही किंवा पेन्सिलीचा लोभही वाटला नाही. तो आपल्याच नादात गुंगणारा वेंधळा मुलगा होता. रात्रीच्या वेळी तो चुकीच्या कंपार्टमेंटमध्ये तर गेलाच होता, पण आपली विजार कुठे ठेवली आहे हेही त्याला आता आठवत नव्हते. पण गेक गाणी मात्र छान म्हणत असे.

तोंड धुवून त्याने आईला 'गुड मॉर्निंग' म्हटले व बाहेरची दृश्ये पाहण्यासाठी खिडकीच्या थंडगार काचेवर आपला चेहरा चिकटवला.

आणि चुक जेव्हा इतर प्रवाशांशी दोस्ती करीत या दारापासून त्या दारापर्यंत भटकत होता व बाटलीचे रबरी बूच, खिळा, दोरीचा तुकडा अशा बारक्यासारक्या भेटवस्तू गोळा करीत होता, त्यावेळी गेक डब्याच्या खिडकीमधून मजेमजेच्या गोष्टी पहात होता.

उदाहरणार्थ, त्याला एक जंगलातली झोपडी दिसली. लांब बाह्यांच्या सदऱ्यातला व भले मोठे नमदी बूट घातलेला एक लहान मुलगा हातात एक मांजर धरून बाहेरच्या व्हरांड्यात उडी मारून आला. अरेच्चा! —ते मांजर मऊ बर्फात धबकन् पडले! कसेबसे त्या मांजराने स्वतःला सावरले व तिथून धूम ठोकली.





त्या मुलाने ते मांजर असे का बरे फेकून दिले? कदाचित त्या मांजराने टेबलावरची खाण्याची एखादी वस्तू पळवली असली पाहिजे.

पण आता ती झोपडी, तो लहान मुलगा आणि ते मांजर नजरेआड झाली होती. त्याऐवजी मैदानात एक गिरणी दिसत होती. मैदान पांढरेशुभ्र होते; धुराडी लाल रंगाची होती. त्यांच्यातून काळाकुट्ट धूर बाहेर पडत होता आणि खिडक्यांमधले दिवे पिवळे दिसत होते.

त्या गिरणीत काय तयार करीत असावेत? पण थांबा! इथं पहाऱ्याची चौकी होती व मेंढकातडी कोट घातलेला पहारेकरी





तिच्याशी उभा होता. त्या मेंढकातडी कोटामुळे तो एवढा भव्य वाटत होता की, त्याच्या हातातली बंदूक अगदी गवताच्या काडीसारखी भासत होती. तरी त्याच्याजवळ जायची कुणाची हिंमत नव्हती!

आणि आता डोळ्यांसमोर जंगल नाचत होते. समोरची झाडे पटकन धावत, तर त्यांच्या मागची थोडी दूरची झाडे मंदपणे सरकत होती. जणू एखाद्या बर्फाच्या शांत नदीमधून ती वहात जात होती.

आपल्या भेटवस्तूंचा खजिना घेऊन चुक कंपार्टमेंटमध्ये परत आला होता. गेकने त्याला आपल्याजवळ बोलावले आणि आता ते दोघेही खिडकीबाहेर पाहू लागले.

आगगाडी मोठ्या, चकचकीत प्रकाशाच्या स्टेशनांमधून वेगाने जात होती. तिथे किमान शंभर इंजिने धूर ओकीत पुढेमागे जात-येत होती. त्याचप्रमाणे अनेक छोटी स्टेशनेही पार होत होती. त्यांच्या मॉस्कोतल्या घराजवळच्या कोपऱ्यावरच्या किराणा दुकानापेक्षा त्या स्टेशनांच्या इमारती फारशा मोठ्या नव्हत्या.

खनिज माती, कोळसा आणि अर्ध्या डब्याच्या लांबीएवढे लाकडाचे ओंडके भरलेल्या आगगाड्या वेगाने शेजारून निघून जात होत्या.

एकदा त्यांनी एका गायी-बैलांनी भरलेल्या आगगाडीला मागे टाकले. त्या आगगाडीचे इंजिन छोटुकले होते आणि त्याची कर्कश्य शिटी वाजत होती. एकाएकी एका बैलाने अशी डरकाळी मारली की, इंजिन ड्रायव्हरने दचकून मागे पाहिले; एखादे भले मोठे आगगाडीचे इंजिन आपल्या मागून येत आहे असे त्याला कदाचित वाटले असावे.

एका छोटया फलाटाशेजारी लष्करी साहित्याने खच्चून भरलेल्या एका आगगाडीबरोबर ते थांबले.

त्या आगगाडीच्या सर्व बाजूंनी ताडपत्रीत गुंडाळलेल्या तोफांच्या पुढे आलेल्या नळ्या छातीत धडकी भरवीत होत्या. आनंदी लाल सैनिक तिच्या भोवती उभे होते. ते हसत होते आणि अंगात ऊब राखण्यासाठी पाय आपटत होते व हातमोजातल्या पंजांनी टाळ्या वाजवीत होते.

पण कातडी कोटातला एक माणूस त्या लष्करी आगगाडीशी अगदी गप्प उभा होता आणि आपल्याच विचारात गढला होता.





तो सेनापती असावा असा चुक आणि गेकने तर्क केला व वोरोशिलोवपासून हुकूमांची वाट पहात असावा, असे त्यांना वाटले.

वाटेवर त्यांनी अशा अनेक गोष्टी पाहिल्या. एकच वाईट गोष्ट म्हणजे बाहेर वादळ घोंघावत होते आणि अनेक वेळा खिडक्यांच्या काचा बर्फाने झाकून जात होत्या.

अखेरीस, एके सकाळी, त्यांची आगगाडी एका छोटया स्टेशनात शिरली.

आईने चुक आणि गेकला खाली उतरवले आणि त्या लष्करी माणसाकडून सामान घेतले न घेतले तोच गाडी पुढे निघाली.



* * *

बर्फात बॅगांचा ढीग करून ठेवला होता. लौकरच तो लाकडी फलाट ओस पडला. पण बाबा कुठेच दिसत नव्हते. आईला बाबांचा खूप राग आला. बॅगांवर मुलांना नजर ठेवायला सांगून, ती घसरगाड्यांच्या गाडीवानांकडे गेली. त्यांच्यासाठी घसरगाड्या पाठवल्या आहेत किंवा नाहीत याची त्यांच्याकडे चौकशी करणे भाग होते, कारण बाबा जिथे रहात होते तिथपर्यंत पोचायला तैगामधून आणखी शंभर किलोमीटरचे अंतर पार करावे लागणार होते.

आईला जाऊन थोडा वेळ उलटला होता. एवढ्यात एक दुष्ट दिसणारा बोकड तिथे आला. प्रथम त्याने थिजलेल्या





ओंडक्याची साल कुरतडली, मग तो अगदी वाईट आवाजात बेंबाटला आणि चुक व गेककडे रोखून पाहू लागला.

चुक आणि गेक पटकन बॅगांमागे लपले. या भागातले बोकड काय करतील त्याचा कधी नेम नाही.

पण नेमकी तेव्हाच आई आली. ती फार कष्टी दिसत होती. कदाचित बाबांना त्यांची तार मिळाली नसावी आणि म्हणून बाबांनी त्यांच्यासाठी स्टेशनावर घसरगाडी पाठवली नसावी, असे तिने मुलांना सांगितले.

त्यांनी घसरगाडीच्या गाडीवानाला बोलावले. आपल्या हातातल्या लांब चाबकाच्या वादीचा त्याने बोकडाच्या पाठीवर

एक रट्टा हाणला, मग बॅगा उचलल्या आणि स्टेशनातल्या आतल्या भागातल्या उपहारगृहात नेल्या.

उपहारगृह अगदीच लहान होते. काऊंटरच्या मागे चुकएवढ्या आकारातला भलामोठा समोवार उकळत होता. तो थरथरत होता व शिट्टी वाजवीत होता आणि त्यातून वाफेचे दाट ढग वरच्या लाकडी छतापर्यंत निघत होते. छताशी काही बारक्या चिमण्यांनी थंडीपासून निवारा करायला एक छोटेसे घरटे बांधले होते व त्याभोवती त्या चिवचिवत होत्या.

चुक आणि गेक चहा पीत होते तेवढ्या वेळात आईने गाडीवानाबरोबर घसरगाडीचा भाव ठरवला. तैगामधून त्यांच्या मुक्कामापर्यंत त्यांना न्यायला त्याने मोठी रक्कम मागितली – शंभर रूबल. पण अंतर खरेच लांब होते. अखेरीस भाडे किती द्यायचे याच्यावर एकमत झाले व पाव, गवत आणि मेंढकातडी गोधड्या आणायला गाडीवान घरी गेला.

"आपण आलो आहोत हे सुद्धा बाबांना माहीत नाही," आई म्हणाली. "आपल्याला बघून त्यांना आश्चर्य वाटेल आणि आनंद होईल नाही?"

"होय, नक्की," चहा पीत चुक अगदी गंभीरपणे म्हणाला. "मला आश्चर्य वाटलं असतं आणि आनंद झाला असता."

"मला पण", गेक म्हणाला. "आपण काय करू या माहीत आहे – उंदरासारखे गुपचुप जाऊ या आणि बाबा जर कुठं बाहेर गेले असतील तर तेवढ्या वेळात बॅगा लपवून अंथरूणात जाऊन झोपू या. ते आत येऊन बसेपर्यंत आपण अगदी गप्प राहू आणि मग एकदम मोठ्यांदा ओरडून त्यांना घाबरवू!"





"मी बिछान्यात लपून बसणार नाही," आई म्हणाली. "किंवा मोठ्यांदा ओरडणारही नाही. हे उद्योग तुम्हीच करा. अरे चुक, तू साखरेच्या वड्या खिशात का कोंबतो आहेस? तुझे खिसे आधीच तट्ट फुगलेत – त्यांच्यात सगळी नेहमीची घाण भरलेली आहेच."

"घोड्यांना खायला देण्यासाठी मी साखर घेतोय," चुकने शांतपणे खुलासा केला. "गेक, तू बनपाव घेतलास तर बरं होईल. तुझ्याजवळ स्वत:चं असं कधीच काही नसतं आणि मग तू सारखा माझ्यापाशी मागत बसतोस."

लौकरच गाडीवान परतला. ऐसपैस घसरगाडीत बॅगा ठेवल्या.

तळाशी गवत पसरले आणि मुलांना गरम पांघरूणांमध्ये व मेंढकातडी गोधडयांमध्ये गुंडाळण्यात आले.

मोठया शहरांना, गिरण्यांना, स्टेशनांना, खेडयांना आणि छोटया वाडयांना आता रामराम! आता पुढे होता जंगलांचा, डोंगरांचा आणि दाट काळ्या अरण्यांचा प्रदेश!

* * *

संध्याकाळपर्यंत त्यांनी मोठया मजेत प्रवास केला. भयाण तैगाच्या अफाट सौंदर्याकडे ते आ वासून पहात होते. पण गाडीवानाची पाठ मध्ये येत असल्याने चुक समोरचा रस्ता नीट पाहू शकत नव्हता. त्यामुळे तो अस्वस्थ झाला आणि बनपाव किंवा गोड बिस्कीट दे असा त्याने आईमागे लकडा लावला.

पण तिने अर्थातच त्याला काहीही दिले नाही. तो रुसला आणि करायला काहीच नव्हते म्हणून गेकला ढकलून घसरगाडीच्या टोकाशी त्याला रेटण्याचा प्रयत्न करीत त्याची खोडी काढू लागला.

प्रथम गेकने शांतपणे त्याला विरोध केला. पण नंतर मात्र त्याला गप्प बसवेना आणि चुकवर तो ओरडला. चुक भडकला आणि गेकवर तुटून पडला. पण बोजड मेंढकातडी गोधडयांमध्ये त्यांचे हात पक्के अडकवले असल्याने, केवळ एकमेकांना कुंची पांघरलेल्या डोक्यांनी टक्कर मारण्यापलिकडे ते काहीही करू शकत नव्हते.

आईने त्यांच्याकडे पाहिले व ती हसली. गाडीवानाने घोडयांवर चाबूक उडवला आणि ते चौखूर धावू लागले.



दोन पांढरेशुभ्र ससे रस्त्यावर उडया मारीत आले आणि नाचू लागले.

"अरे ए! सांभाळा!" गाडीवान ओरडला. "सांभाळा, नाहीतर गाडीखाली चिरडाल!"

ते खोडकर ससे जंगलात गुडुप झाले.

चावरा वारा त्यांच्या तोंडांवर झोंबत होता. तैगातल्या डोंगरदऱ्यातून घसरगाडी तुफान वेगाने दौडत होती तेव्हा एकमेकांना गच्च मिठी मारून बसणे चुक आणि गेकला भागच होते. जवळ



येत चाललेल्या निळ्या डोंगरांच्या मागून हळूहळू उगवत असलेल्या चंद्राच्या दिशेने त्यांची जोरदार दौड चालू होती.

बर्फाने माखलेल्या एका छोटया झोपडीजवळ घोडे आपणहून एकाएकी थांबले.

"आज रात्रीचा मुक्काम आपण इथं करायचा," घसरगाडीमधून खाली उडी टाकत गाडीवान म्हणाला. "हे आपलं स्टेशन."

झोपडी छोटी असली तरी भक्कम होती. तिथे कुणीही रहात नव्हते.

लौकरच किटलीत पाणी उकळायला ठेवले आणि गाडीवान अन्नाचा हारा घेऊन आला.

कबाब एवढे घट्ट आणि थिजले होते की, खिळे ठोकायला हातोडयांएवजी त्यांचा उपयोग करता आला असता. त्यांनी त्यांना गरम पाण्यात बुचकळले आणि पावाचे तुकडे गरम चुलाण्यावर ठेवले.

चुलाण्यामागे हुडकाहुडकी करताना चुकने एक वाकलेली स्प्रिंग शोधून काढली. जनावरांना पकडण्याच्या सापळ्याचा तो एक भाग होता असे गाडीवानाने त्याला सांगितले.

त्या स्प्रिंगला गंज चढला होता. तिचा वापर होत नव्हता हे स्पष्ट होते. ही गोष्ट चुकच्या ताबडतोब ध्यानात आली.

जेवणानंतर त्यांनी झोपण्याची तयारी केली. भिंतीशी एक रुंद लाकडी पलंग होता. वाळल्या पानांचा भलामोठा ढिगारा पसरून बिछाना तयार केलेला होता. भिंतीलगतच्या कडेला किंवा पलंगाच्या मध्यभागी झोपायला गेक तयार नव्हता. त्याला





बाहेरच्या बाजूला झोपायला आवडायचे. आणि गादीच्या बाहेरच्या अंगाला झोपू नये अशा अर्थाचे एक छोटेंसे अंगाईगीत म्हणून लहानपणी आई त्याला झोपवत होती, हे जरी त्याला अद्याप आठवत असले, तरी ती नेहमी बाहेरच्या अंगाला झोपत असे.

जर आपण मध्यभागी झोपलो आहोत असे त्याला आढळले, तर तो हमखास आपल्या शेजारच्यांची पांघरूणे खेचून घ्यायचा, त्यांच्यात आपले कोपर खुपसायचा आणि चुकच्या पोटात आपले ढोपर ढोसायचा.

अंगावरचे कपडे न बदलताच ते तसेच बिछान्यावर आडवे



झाले आणि मेंढकातडी गोधडयांनी त्यांनी स्वतःला लपेटून घेतले. चुक भिंतीशी झोपला, आई मध्ये झोपली आणि गेक बाहेरच्या अंगाला झोपला.

गाडीवानाने मेणबत्ती विझवली आणि चुलाण्यावरच्या ओटयावर आपली पथारी टाकली. ते ताबडतोब झोपी गेले. पण रात्री नेहमीप्रमाणे गेकला तहान लागून जाग आली.

अर्धवट झोपेच्या गुंगीतच त्याने आपले नमदी बूट पायात चढवले, टेबलाशी तो चाचपडत गेला, किटलीतले थोडे पाणी प्यायला आणि मग खिडकीशी एक स्टुलावर बसला.





चंद्र ढगांआड लपला होता आणि थिजलेल्या खिडकीच्या तावदानांमधून बर्फाचे ढिगारे निळसर काळे दिसत होते.

"असं वाटतंय की, बाबा पृथ्वीच्या अगदी पार एका टोकाला पोचलेत!"

या ठिकाणापेक्षा अधिक दूरची ठिकाणे या जगात असणे शक्य नाही, अशी गेकची पक्की खात्री झाली होती.

एकदम त्याने मान वर केली. खिडकीबाहेर कुणी ठोठावत आहे असे त्याला वाटले. पण आता त्याला वाटले की, तो ठोठावण्याचा आवाज नाही, तर कुणाच्या तरी अवजड पायांखाली

बर्फ चुरडण्याचा आवाज होतोय. होय, नक्की तसाच आवाज! बाहेर कुणीतरी अंधारात मोठा सुस्कारा टाकला, हालचाल केली आणि पावले उचलली. ते अस्वल असले पाहिजे अशी गेकची खात्री झाली.

"दुष्ट अस्वला! तुला काय पाहिजे? बाबांना भेटायला आम्हाला आधीच एवढा उशीर लागतोय आणि तू आम्हाला खाऊन टाकायला पाहतोस? म्हणजे आम्ही आमच्या बाबांना कधीच भेटायला नको! नको रे असं करू नको! कुणीतरी आपल्या नेमबाज बंदुकीनं तुला गोळी घालण्यापूर्वी किंवा धारदार तलवारीनं तुला भोसकण्यापूर्वी तू निघून जा कसा!"

त्या अरुंद खिडकीच्या थिजलेल्या तावदानावर आपला चेहरा घट्ट दाबून गेंगाण्या आवाजात गेक वरील शब्द बडबडत होता. त्याला भीती वाटत होती, पण त्याचवेळी कुतूहलही वाटत होते.

तेवढ्यात धावणाऱ्या ढगांमधून चंद्र बाहेर आला. निळसर काळ्या बर्फाच्या ढिगांना आता मंद दुधाळ चमक आली आणि गेकने पाहिले की, ज्याला तो अस्वल समजत होता ते अस्वल नसून त्यांचा घोडा होता. त्याचा लगाम सुटल्याने तो घसरगाडीभोवती खूर आपटीत फिरत होता आणि गाडीतले गवत चरत होता.

गेकची फार निराशा झाली. तो पुन्हा गोधडीत शिरला. आणि वाईट विचार त्याच्या मनात आले होते, त्यामुळे त्याला स्वप्नही वाईट पडले.





गेकला पडले स्वप्न अजब
राक्षस पाहून उडाला गहजब
थुंकी भाजे त्याची नि कापे चरचरा
वज्रमुष्टी प्रहार त्याचा भेसूर हसे खदखदा.

तुडवल्या बर्फापल्याड धगधगती ज्वाला
लांबटांग्या सैनिकांच्या येती रांगामागून रांगा
संगे खेचून आणीत होते घाणीचा गाडा
फडकत होता त्यावर दुष्ट फॅसिस्ट स्वस्तिक झेंडा.

"अरे थांबा!" गेक त्यांच्यावर खेकसला. "तुम्ही चुकीच्या रस्त्यानं जाताय! तुम्ही इकडं येऊ शकत नाही!"

पण कुणीही गेकचे ऐकले नाही व थांबले नाही.

रागारागाने त्याने चुकच्या डबीत ठेवलेली पत्र्याची पिपाणी काढून एवढ्या जोराने वाजवली की, त्या लष्करी आगगाडीच्या जवळ आपल्याच तंद्रीत उभा असलेला तो सेनापती एकदम खडबडून जागा झाला. त्याने केवळ आपला भव्य आज्ञादर्शक हात वर उचलला आणि त्याच्या त्या सर्व अक्राळविक्राळ तोफांनी एकाच वेळी गडगडाट केला.

"शाब्बास!" गेक खूष होऊन ओरडला. "त्यांना आणखी थोडा प्रसाद द्या! एवढ्या एकानं त्यांचं भागायचं नाही!"

* * *

आपल्या दोन गोजिरवाण्या मुलांच्या अस्वस्थ हालचालीमुळे आईला जाग आली.

ती चुककडे वळली आणि काहीतरी टणक व टोकदार वस्तू तिच्या कुशीत टोचली. तिने त्या वस्तूला चाचपून हाताने खेचले. सगळ्या वस्तू जमवून ठेवण्याचा नाद असणाऱ्या चुकने ती सापळ्याची स्प्रिंग गुपचुप बिछान्याखाली दडवून ठेवली होती.

तिने ती पलंगामागे फेकून दिली. मग चांदण्याच्या उजेडात तिने गेकचा चेहरा न्याहाळला. त्याला वाईट स्वप्न पडत होते हे तिच्या लक्षात आले.

अर्थात स्वप्न काही स्प्रिंगसारखे फेकून देता येत नाही. पण ते उडवून लावता येते. म्हणून तिने त्याची कूस वळवली आणि



त्याला हळूहळू थोपटून त्याच्या तापल्या कपाळावर हळुवार फुंकरी घालायला सुरुवात केली.

लौकरच गेकने आपल्या ओठांवरून जीभ फिरविली आणि तो हसला. याचा अर्थ त्याची वाईट स्वप्ने उडून गेली होती

त्यानंतर आई बिछान्यातून उठली आणि खिडकीशी गेली.

अजून पहाट उजाडली नव्हती आणि आकाश चांदण्यांनी खच्चून भरले होते. काही तारे दूरवर चमकत होते, तर काही चांदण्या अगदी तैंगावर ओठंगल्या होत्या.

आणि काय आश्चर्य! छोटा गेक ज्या ठिकाणी बसला होता त्याच ठिकाणी ती बसली व ज्याप्रमाणे त्याच्या मनात विचार आले होते त्याचप्रमाणे तिच्याही मनात विचार आले की, तिचा धाडसी पती ज्या ठिकाणी आला आहे त्या या ठिकाणाहून अतिदूरची ठिकाणे या जगात फारशी असणार नाहीत.

* * *

दुसरा सबंध दिवस ते जंगलांमधून आणि डोंगरांमधून प्रवास करीत होते. चढ लागला म्हणजे गाडीवान खाली उतरायचा आणि गाडीबरोबर बर्फ तुडवीत चालायचा. पण जोरदार उतारांवर त्यांची घसरगाडी एवढ्या जोरात घसरत जायची की, चुक आणि गेकला वाटायचे—ती घसरगाडी, घोडे आणि ते सगळे जणू आकाशातून खाली कोसळत आहेत.

अखेरीस, संध्याकाळच्या सुमाराला, जेव्हा प्रवासी आणि घोडे असे दोघेही पुरते थकून गेले होते, तेव्हा गाडीवान म्हणाला:



"पोचलो एकदाचे आपण! त्या टोकापलिकडं एक वळण आहे. आणि त्यापुढं मोकळ्या मैदानात आपल्याला छावणी दिसेल."

"चला रे! हाईक! च्यॅक च्यॅक च्यॅक!" त्याने घोडचांना पिटाळले.

आनंदाने आरोळ्या ठोकत चुक आणि गेकने उडचा मारल्या, पण त्याचवेळी घसरगाडीला गचका बसला आणि ते मागच्या मागे गवतात दाणकन आदळले.

आईने स्मित केले आणि आपल्या डोक्यावरच्या टोपीभोवती गुंडाळलेला लोकरी गळपट्टा तिने मागे फेकला.



वळण आले. घसरगाडीने एक झोकदार गिरकी घेतली आणि त्या जंगलातल्या मध्यभागी वाऱ्यांच्या आडोशाला मोकळ्या मैदानात उभारलेल्या तीन छोटचा घरांजवळ येऊन थांबली.

पण काय आश्चर्य! एकाही कुत्र्याचे भुंकणे ऐकू आले नाही. आसमंतात चिटपाखरू दिसत नव्हते.

धुराडचांमधून धूर येत नव्हता. सर्व पायवाटांवर बर्फ पसरले होते आणि हिवाळ्यातली सुन्न शांतता सर्वत्र पसरली होती. या झाडावरून त्या झाडावर निष्कारण उडचा मारीत फिरणारे काही काळ्या-पांढऱ्या रंगाचे नीलकण्ठ पक्षी सोडल्यास दुसरे सजीव प्राणी कुणीही दिसत नव्हते.

"हेच ठिकाण अशी तुमची खात्री आहे ना?" घाबरल्या सुरात आईने गाडीवानाला विचारले.

"होय होय हेच!" गाडीवान म्हणाला. "ही तीन घरं म्हणजेच तीन नंबरचं भूगर्भशास्त्रीय संशोधन केंद्र, ती बघा, तशी पाटीसुद्धा लावलीय तिथं! तुम्हाला चार नंबरचं केंद्र तर नकोय ना? तसं असेल तर स्टेशनापासून दुसऱ्या दिशेला ते सुमारे दोनशे किलोमीटरवर आहे."

"नाही नाही," पाटीकडे एकटक पहात आई म्हणाली. "मला हेच केंद्र पाहिजे होतं. पण सगळ्या दारांना कुलपं लावलीत आणि व्हरांडचांमधून बर्फ साचलाय. कुठं असावेत सगळेजण?"

"ते मला सांगता येणार नाही," गोंधळलेला गाडीवान म्हणाला. "गेल्या आठवडचात आम्ही सामान आणलं. थोडं पीठ, कांदे आणि बटाटे. सगळी माणसं इथं होती. मुख्य आणि



पहारेकरी सोडून आठ जण. ही काहीतरी भलतीच गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण झालीय! त्या सर्वांना एकदम लांडग्यांनी खाऊन टाकणंही शक्य नाही. तुम्ही जरा इथं थांबा. तोपर्यंत मी पहारेकऱ्याच्या घरात चौकशी करून येतो."

मेंढकातडी गोधडी बाजूला फेकून गाडीवान बर्फ तुडवीत अगदी शेवटच्या झोपडीकडे गेला.

लौकरच तो परत आला.

"घरात कुणी नाही. पण चुलाणा अजून गरम आहे. पहारेकरी इथंच आसपास असला पाहिजे— तो शिकारीला बाहेर पडला



असावा. रात्र पडण्यापूर्वी तो परत येईल आणि तुम्हाला हवी ती माहिती सांगील".

"पण तो काय सांगणार मला?" आई थोडीशी चिडीच्या सुरात म्हणाली. "इथली माणसं जाऊन काही काळ लोटलाय हे मला स्पष्ट दिसतंय."

"तो काय सांगील ते माहीत नाही", गाडीवान म्हणाला. "पण काहीतरी माहिती तो नक्कीच सांगील, कारण तो इथला पहारेकरी आहे."

पहारेकऱ्याच्या झोपडीच्या व्हरांड्यापर्यंत मोठ्या कष्टाने त्यांनी घसरगाडी नेली. तिथून एक अरुंद पायवाट जंगलाकडे जात होती.



फाटकातून ते आत गेले. फावडी, झाडू, कुऱ्हाडी आणि काठ्यांचा ढिगारा त्यांनी पार केला. एका लोखंडी आकडीला टांगलेली अस्वलाची गोठलेली कातडी त्यांनी पाहिली आणि त्यांनी खोलीत प्रवेश केला. गाडीवानाने बॅगा आणल्या.

झोपडीत उबदार वाटत होते.

घोड्यांना दाणा-वैरण द्यायला गाडीवान बाहेर गेला. घाबरलेल्या मुलांच्या अंगातले कोट आईने मुकाटपणे उतरवले.

"एवढ्या लांबचा प्रवास करून आलो आणि बाबा निघून गेलेत हे अगदी भयंकर आहे!"

आईने बाकड्यावर बसकण घातली आणि तिने खूप विचार केला. काय घडले असावे? छावणी सोडून माणसे का गेली असावीत? आता आपण काय करायचे? परत जायचे? पण आत्ताचे गाडीभाडे देण्यापुरतेच जेमतेम पैसे तिच्याजवळ होते. त्यांना पहारेकऱ्याची वाट पाहणे भाग होते. पण गाडीवान आणखी तीन तासांनी परत जाणार होता – आणि त्यापूर्वी पहारेकरी आला नाही तर? सर्वांत जवळचे रेल्वे स्टेशन आणि तार ऑफिस जवळ जवळ शंभर किलोमीटर लांब होते.

गाडीवान आत आला, त्याने खोलीभर नजर टाकली, हुंगल्यासारखे केले आणि चुलाण्याजवळ जाऊन भांड्यात डोकावून पाहिले.

"पहारेकरी रात्रीपूर्वी नक्की परत येईल," त्याने त्यांना धीर दिला. "इथं कोबीच्या साराचं भांडं आहे पहा. जर तो खूप लांब जाणार असता, तर हे भांडं त्यानं बाहेरच्या थंड हवेत





ठेवलं असतं. पण तुम्हाला जे योग्य वाटेल ते पहा," गाडीवान बोलतच होता. "एकूण परिस्थिती माझ्या लक्षात आलीय. मी स्टेशनापर्यंत तुम्हाला फुकट परत न्यायला तयार आहे. मलासुद्धा माणुसकी आहे."

"छे छे," आई म्हणाली. "स्टेशनावर परत जाण्यात काहीच अर्थ नाही."

त्यांनी पुन्हा एकदा किटलीत पाणी उकळत ठेवले, कबाब गरम करून खाल्ले. आई सर्व सामान आत आणून ठेवीत होती तेव्हा चुक आणि गेक चलाण्यावरच्या उबदार ओटयावर चढून बसले होते. तिथे भोजाच्या झाडाच्या डहाळ्यांचा, तापलेल्या मेंढकातडयांचा आणि देवदाराच्या सालींचा वास सुटला होता. आई अस्वस्थ व गप्प असल्याने चुक आणि गेकही गप्प होते. पण असे फार वेळ गप्प राहणें अवघड होते. अखेरीस काहीच करण्यासारखे नसल्याने चुक आणि गेक लौकरच झोपी गेले.

गाडीवान केव्हा निघून गेला आणि आई त्यांच्याशेजारी बिछान्यावर केव्हा येऊन पडली याचा चुक आणि गेकला पत्ताच





नव्हता. त्यांना जेव्हा जाग आली तेव्हा झोपडीत चांगलाच अंधार पसरला होता. व्हरांडयात कुणीतरी दाणदाण आपटण्याचा आवाज केल्यामुळे त्या तिघांनाही एकदमच जाग आली. फाटकाशीच काहीतरी जोरात खाली आपटले. बहुधा फावडे असावे. खाडकन दार उघडले गेले आणि हातात दिवा घेऊन एका धिप्पाड केसाळ कुत्र्यासह पहारेकरी आत आला.

त्याने पाठीवरची बंदूक खाली उतरवली, मेलेला ससा बाकडयावर फेकला आणि चुलाण्यापर्यंत दिवा वर उचलून म्हणाला:

"तुम्ही कोण आहात सांगा बघू?"

"मी सेर्योगिन यांची, भूगर्भशास्त्रीय पथकाच्या प्रमुखांची बायको," ओटयावरून खाली उतरीत आई उत्तरली. "आणि ही त्यांची मुलं."

चुक आणि गेकच्या घाबरलेल्या चेहऱ्यांवर पहारेकऱ्याने दिव्याचा उजेड धरला.

"अगदी थेट बापाच्या वळणावर गेलेत पठ्ठे. हा गबदुल तर विशेषच." त्याने चुककडे बोट दाखवीत म्हटले.

चुक आणि गेक अशा दोघांनाही वाईट वाटले. त्या माणसाने गबदुल म्हटले म्हणून चुक दुखावला आणि गेक दुखावला त्याचे कारण चुकपेक्षा आपण बाबांसारखे जास्त दिसतो असे त्याला वाटत होते.

"आता मला सांगा, तुम्ही असे घाईगर्दीनं इथं का आलात?" आईकडे नजर टाकीत पहारेकऱ्याने विचारले. "तुम्ही येऊ नका असं तुम्हारा कळवलं होतं ना?"

"मला तुमच्या बोलण्याचा अर्थच उमगत नाही. येऊ नका असं आम्हाला कुणी सांगितलं?"

"येऊ नका असं तुम्हाला कळवण्यात आलं होतं. मी खुद्द स्वतःच सेर्योगिन यांनी लिहिलेली तार घेऊन स्टेशनाकडं गेलो होतो आणि तारेत स्वच्छ म्हटलं होतं : 'आणखी दोन आठवडेपर्यंत येणं लांबणीवर टाका. पथक तातडीच्या कामासाठी तैगामध्ये जातंय.'"

"आणि सेर्योगिन जेव्हा म्हणतात, 'येणं लांबणीवर टाका,'





याचा अर्थ येणं लांबणीवर टाका. तुम्ही त्यांच्या हुकूमाचा भंग करून आला आहात."

"कुठल्या तारेबद्दल बोलता आहात तुम्ही?" आईने विचारले. "आम्हाला कुठलीच तार वगैरे मिळाली नाही." आणि आपल्या बोलण्याला दुजोरा मिळावा म्हणून गोंधळल्या नजरेने तिने चुक व गेककडे पाहिले.

पण ते दोघे घाबरल्या चेहऱ्यांनी एकमेकांना डोळ्यांनी खूणावत असल्याचे व चटकन भिंतीकडे मागे सरकल्याचे तिच्या लक्षात आले.



"मुलांनो," आपल्या मुलांकडे संशयाने पहात ती म्हणाली. "मी घरात नसताना एखादी तार आली होती?"

ओटचावर वाळक्या फांद्यांचा आणि सालींचा आवाज ऐकू आला. पण उत्तर मात्र आले नाही.

"छळवाद्यांनो, उत्तर द्या मला!" आई ओरडली. "मी घरात नसताना तुम्हाला एखादी तार मिळाली आणि ती मला द्यायला तुम्ही विसरलात काय?"

आणखी काही सेकंद तसेच गेले. मग एकाएकी ओटचावरून जोरदार भांडणाचे आवाज कोसळू लागले. चुकच्या आवाजाची





पट्टी खालची होती, तर गेक अगदी तारस्वरात ओरडत होता.

"कारट्यांनो!" आई उद्‌गारली. "एक दिवस तुम्ही माझा जीव घेणार. बंद करा तुमचं भांडण आणि काय काय घडलं ते सारं स्पष्ट सांगा."

"जीव घेणार" या शब्दासरशी चुक आणि गेक यांच्यातले भांडण आणखीच वाढले. त्यांना शांत करून सर्व हकीकत त्यांच्यापासून काढून घेईपर्यंत बराच वेळ गेला. पण नक्की दोष कुणाचा याबाबत अखेरपर्यंत दोघांमध्ये धुसफुस चालू होती.

* * *

अशा मुलांबरोबर कसे वागायचे? त्यांना मार द्यायचा? कोंडून घालायचे? साखळदंड आणि लोखंडी गोळा बांधून सक्त मजुरीवर पाठवायचे? पण आईने यांपैकी काहीच केले नाही. तिने एक उसासा टाकला आणि आपल्या मुलांना ओटयावरून खाली उतरायला सांगितले; त्यांना आपापली नाके पुसायला सांगून तोंडे धुवायला सांगितले आणि आता आपण काय करावे असा प्रश्न पहारेकऱ्याला विचारला.

पहारेकऱ्याने सांगितले की, संशोधक पथक तातडीच्या कामासाठी अल्कराश खिंडीत गेले असून निदान दहा दिवस परत येणार नाही.

"पण दहा दिवस आम्ही कसे काढणार?" आईने विचारले. "आमच्याजवळ खायला काही नाही!"

"तुम्हाला कसं तरी भागवलं पाहिजे," पहारेकरी म्हणाला. "मी तुमच्यासाठी थोडा पाव ठेवतो आणि हा ससा तुम्ही घ्या. त्याला सोला आणि शिजवा. उद्या मी तैगात जाणार आहे आणि दोन दिवस परत येणार नाही. मला माझ्या सापळ्यांची पाहणी केली पाहिजे."

"हे काही ठीक नाही," आई म्हणाली. "आम्ही इथं एकटे कसे राहणार? या जागेची आम्हाला धड माहिती नाही आणि आमच्या भोवती दुसरं तिसरं काही नाही – नुसतं अरण्य पसरलंय आणि जंगली जनावरं..."

"मी तुमच्यापाशी बंदूक ठेवून जातो," पहारेकरी म्हणाला. "पडवीत लाकडं आहेत आणि टेकाडापलिकडं झरा आहे. हे





धान्याचं पोतं. डब्यात मीठ आहे. मला तुमची सरबराई करीत बसायला वेळ नाही, समजलं..."

"काय उर्मट माणूस आहे रे," गेक चुकच्या कानात कुजबुजला. "चल, आपण पण त्याला झणझणीत उत्तर देऊ या."

"नको," चुक म्हणाला. "आपण तसं केलं तर तो आपल्याला घरातून बाहेर फेकून देईल. बाबा येईपर्यंत गप्प बसणं चांगलं! मग आपण त्याला सुनवू!"

"बाबा येईपर्यंत थांबायचं? पण तोपर्यंत हा इथं रहायचा नाही."



गेक आईपाशी गेला, तिच्या मांडीवर चढून बसला आणि कपाळाला आठ्या घालून त्या उद्धट पहारेकऱ्याकडे रोखून पाहू लागला.

पहारेकऱ्याने आपल्या अंगातला केसाळ कोट काढला आणि दिवा ज्या टेबलापाशी ठेवला होता तेथे तो आला.

त्याच्या कोटाच्या मागच्या बाजूचा केसाळ कातडीचा मोठा भाग टरकावला गेला आहे हे तेव्हा कुठे गेकच्या लक्षात आले. अगदी खांद्यापासून कमरेच्या पट्ट्यापर्यंत फाळा गेला होता.

"कोबीचं सार तिथं चुलाण्यावर आहे," तो आईला म्हणाला. "तिथं फडताळावर चमचे आणि वाडगी आहेत. बसा आणि खा. तोपर्यंत मी माझा कोट शिवतो."





"तुम्ही या घराचे मालक आहात," आई म्हणाली. "तुम्ही जेवणाची मांडामांड करा आणि माझ्यापाशी तुमचा कोट द्या. तुमच्यापेक्षा खात्रीनं मी तो अधिक चांगला शिवीन."

पहारेकऱ्याने एकवार तिच्याकडे पाहिले आणि नंतर गेकच्या रागीट नजरेला नजर भिडवली.

"भलताच ताठ पोरगा दिसतोयस तू," तो पुटपुटला. आपला कोट तिच्याजवळ देऊन तो पहारेकरी जेवणाची भांडी घ्यायला फडताळाकडे गेला.

"तुमचा कोट असा कशानं फाटला?" चुकने त्या फाटलेल्या कोटाकडे बोट दाखवीत त्याला विचारले.

"अस्वलाबरोबर थोडी मस्ती केली. त्यानं मला एक ओरखडा काढला", मोठ्या अनिच्छेने पहारेकरी उत्तरला आणि त्याने कोबीच्या साराचे भांडे टेबलावर ठेवले.

"अरे गेक, तू ऐकलंस?" तो पहारेकरी जेव्हा खोलीतून बाहेर गेला तेव्हा चुक ओरडला. "त्याची अस्वलाबरोबर लढाई झाली; मला वाटतं, म्हणूनच तो आज एवढा रागात असावा."

गेकने ते ऐकले होते, तरीही आपल्या आईचा कुणीही अपमान केलेला त्याला अजिबात आवडत नसे; मग तो अस्वलाशी एकटयाने झुंज घेणारा शूर माणूस असला तरी!

* * *

दुसऱ्या दिवशी पहाटेच, पहारेकऱ्याने आपली धोपटी घेतली, बंदूक व कुत्रा सांगाती घेतले, पायात घसरपट्टया चढवल्या आणि जंगलात तो दिसेनासा झाला. आता त्यांना स्वतःच्या जबाबदारीवर तेथे राहणे भाग होते.

ती तिघेही पाणी आणायला गेली. टेकाडाच्या दुसऱ्या बाजूला, एका उंच कडयामधून पाण्याचा एक छोटा झरा मोठ्या वेगात खाली वहात येऊन बर्फात घुसत होता. किटलीतून दाट वाफ यावी तशी वाफ त्या पाण्यातून येत होती, पण जेव्हा चुकने त्या झऱ्यात बोट बुडवले तेव्हा पाणी बर्फासारखे थंडगार असल्याचे त्याला आढळले.

नंतर त्यांनी थोडी लाकडे आणली. तो चुलाणा कसा पेटवायचा याची आईला माहिती नव्हती आणि बराच वेळपर्यंत





लाकडे पेट घेईनात. पण जेव्हा लाकडे पेटू लागली तेव्हा त्यांच्या ज्वाळा एवढ्या गरम होत्या की, समोरच्या भिंतीच्या खिडकीवरचा बर्फाचा दाट थर एका क्षणात वितळून गेला. आता खिडकीमधून जंगलाची कड दिसत होती, झाडांच्या या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारणारे नीलकण्ठ पक्षी दिसत होते, निळ्या डोंगरांचे खडकाळ सुळके दिसत होते.

कोंबडीची पिसे साफ करून ती कशी सोलायची ते आईला माहीत होते, पण तिने ससा कधीही सोलला नव्हता. त्यामुळे तिने ससा सोलायला जेवढा वेळ घेतला, त्या वेळात एखादा बैल सहज सोलून झाला असता.

हा ससा सोलण्याचा प्रकार गेकला अजिबात आवडत नव्हता, पण चुकने मात्र आपण होऊन आईला मदत केली आणि त्याबद्दल सशाची शेपटी बक्षीस मिळवली; ती एवढी हलकी आणि गंडेदार होती की, चुलाण्यावरच्या ओटयावरून त्याने जेव्हा तिला खाली टाकले तेव्हा हवाई छत्रीसारखी ती तरंगत गेली.

जेवणानंतर तिघेही थोडे फिरायला गेली.

बंदूक किंवा निदान काही काडतूसे बरोबर घ्यावीत असा चुकने आईला खूप आग्रह केला. पण बंदूक घ्यायला ती तयार नव्हती.

त्याऐवजी, तिने ती बंदूक अतिउंच खिळ्यावर अडकवून टाकली, काडतूसे उंच फडताळावर ठेवली आणि चुकने एक जरी काडतूस घेतले तरी जन्माची अद्दल घडवीन, अशी तिने त्याला तंबी दिली.



चुक गोरामोरा झाला आणि तिथून दूर पळाला. एव्हाना एक काडतूस त्याच्या खिशात होते.

त्यांचे ते फिरणे खरेच मजेदार होते. झऱ्याकडे जाणाऱ्या अरुंद पायवाटेवरून एकेकाच्या रांकेत ते जात होते. डोक्यावरचे निळे आकाश स्तब्ध होते आणि निळ्या डोंगरांची खडबडीत शिखरे स्वप्नातल्या किल्ल्यांसारखी आणि मनोऱ्यांसारखी दिसत होती. त्या थिजलेल्या शांततेचा भंग नीलकण्ठ पक्ष्यांच्या ओरडण्यानेच तेवढा होत होता. देवदाराच्या जाडजूड फांद्यांवरून चपळ पायाच्या खारी भराभर उड्या घेत होत्या. झाडांच्या पायथ्याशी पसरलेल्या मखमली पांढऱ्याशुभ्र बर्फाच्या गालिच्यावर अनोळखी पशूंच्या आणि पक्ष्यांच्या पावलांच्या ठशांनी अजब नक्षीकाम विणले होते.

एकाएकी धप्प असा एक आवाज व त्या पाठोपाठ कडकडाट तैगामध्ये ऐकू आला. बहुधा एखाद्या झाडाच्या शेंड्यावर थिजलेला बर्फाचा मोठा खडा फुटून खाली कोसळला असावा.

यापूर्वी मॉस्कोत असताना, सारे जग फक्त मॉस्कोत, तिथल्या रस्त्यांत, घरांमध्ये, ट्रामगाड्यांमध्ये आणि बसगाड्यांमध्ये सामावले आहे, अशी गेकची कल्पना होती.

आता त्याला वाटत होते की, सबंध जग म्हणजे एक भले मोठे काळेकुट्ट अरण्य आहे.

गेकचा स्वभाव हा असा होता; जर त्याच्या डोक्यावर सूर्य तळपत असेल, तर सबंध पृथ्वीवर आकाश निरभ्र आहे आणि कुठेही पाऊस पडत नाही, असे त्याला वाटायचे.

आणि जेव्हा त्याला आनंद व्हायचा, तेव्हा जगातला प्रत्येक माणूस आनंदी असला पाहिजे असे त्याला वाटायचे.

* * *

दोन दिवस उलटले. तिसरा दिवस उजाडला. अजून पहारेकऱ्याचा पत्ता नव्हता. त्या बर्फाने वेढलेल्या छोटया झोपडीत काळजीचे वातावरण पसरले होते.

संध्याकाळी आणि रात्रीच्या वेळी तर फारच भयानक वाटायचे. खोलीच्या आणि व्हरांडयाच्या अशा दोन्ही दारांना कडया लावून ते कुलुपे ठोकीत आणि जनावरांनी उजेड पाहून घराजवळ येऊ नये म्हणून खिडक्यांवर चटया लावून त्या झाकून टाकीत; खरे म्हणजे त्यांनी नेमके याच्या उलट करायला पाहिजे होते, कारण जनावर म्हणजे काही माणूस नव्हे आणि ते उजेडाला घाबरते. पण धुराडयामधून वारा मात्र जोरात घोंघावत होता आणि बाहेर जेव्हा हिमवादळाचा सोसाटा उठे तेव्हा बर्फाचे छोटे खडे भिंतींवर आणि खिडक्यांवर जोरात आपटत व आतल्या लोकांना असा भास होई की, जणू कोणी तरी नख्या घासत आहे.

चुलाण्यावरच्या ओटयावरच्या बिछान्यात ते पडून राहिले आणि आईने त्यांना तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी व परीकथा सांगितल्या. अखेरीस ती दमून झोपी गेली.

"चुक," गेक म्हणाला. "फक्त परीकथांमध्येच जादुगार का असतात? खरे जादुगार असते तर मजा आली असती की नाही?"

"आणि चेटक्या नि सैतानसुद्धा?"



गेकने नापसंतीने मान हलवली. "छे:, सैतानांची इथं कुणाला गरज आहे? त्यांचा काहीच उपयोग होत नाही. पण आपण जर जादुगाराला बोलवू शकलो तर, त्याला आपण सांगू शकू की, बाबांच्यापर्यंत उडत उडत जा आणि आम्ही इथं केव्हाचे येऊन थांबलो आहोत म्हणून सांग."

"पण तो कशावरून उडत जाईल?"

"कशावरून? .. त्यात काय आहे, त्यानं नुसते हात पसरले किंवा आणखी काही केलं म्हणजे झालं. तो शोधील काहीतरी युक्ती, तू त्याची काळजी करू नको."

"हात पसरून उडत जायचं म्हटलं तर त्याला फार थंडी वाजेल," चुक म्हणाला. "माझ्याकडंच बघ: माझ्या हातात हातमोजे होते, शिवाय लोकरीचे विणलेले हातमोजेही होते आणि तरीही लाकडं आणताना माझी बोटं गोठली होती."

"पण चुक, खरं सांग, असं झालं तर गंमत येईल की नाही?"

चुक गडबडला. "मला कसं माहीत असणार? आपल्या कुंपणात मीष्का क्रीउकोव राहतो तिथं तळघरात राहणारा लंगडा माणूस तुला आठवतो? तो कणकेची गोडी बिस्कीटं विकायचा आणि सगळ्या म्हाताऱ्या बायका त्याच्याकडं येऊन आपलं भविष्य विचारायच्या – म्हणजे कुणाचं नशीब चांगलं आहे नि कुणाचं वाईट आहे वगैरे सांगायचा."

"पण त्यांची भविष्यं खरी ठरायची?"

"मला नाही माहीत. मला एवढंच ठाऊक आहे की, एक

दिवस पोलिस आले आणि त्याला घेऊन गेले. नंतर त्याच्या जागेत अनेक चोरीच्या वस्तू सापडल्या."

"म्हणजे तो जादुगार नव्हता. नुसताच लबाड माणूस होता. तुला काय वाटतं?"

"अर्थातच तो लबाड माणूस होता," चुकने कबुली दिली. "पण मला असं म्हणायचंय की, सगळे जादुगार लबाड असतात. आपल्याला काय पाहिजे ती गोष्ट बिळात सरपटत जाऊन मिळवता येत असताना, त्याच्यासारख्या माणसाला काम कसं करावंसं वाटेल? पण गेक, आता तू झोप. मी तुझ्याशी आणखी बोलत बसणार नाही."

"का?"

"कारण तू खूप मूर्खासारखी बडबड चालवली आहेस. मग रात्री तुला वाईट स्वप्नं पडतील आणि आपले गुडघे नि कोपर तू माझ्या कुशीत खुपसत बसशील. काल रात्री तू माझ्या पोटात गुद्दा हाणलास तेव्हा मला काय छान वाटलं असं तुला वाटलं? मी तुला मारतो म्हणजे बघ कसं वाटतं ते!"

* * *

चौथ्या दिवशी सकाळी स्वतः आईनेच सर्पणासाठी लाकडे फोडली. तो ससा त्यांनी केव्हाच संपवला होता आणि नीलकण्ठ पक्ष्यांनी त्याची हाडे केव्हाच साफ केली होती. त्यादिवशी जेवणाला फक्त कांजी आणि डुकराची चरबी व कांदे होते. त्यांच्याजवळचा पावाचा साठा संपत आला होता, पण आईला थोडे पीठ सापडले होते व तिने त्यांच्यासाठी थोडी बिस्कीटे भाजली.



त्या तसल्या जेवणानंतर गेक एकदम मलूल पडला. त्याला कदाचित ताप आला असावा अशी आईला शंका आली.

त्याला घरातच बसून राहण्याची तिने आज्ञा केली. मग तिने चुकच्या अंगात कपडे घातले, बादल्या व छोटी घसरगाडी घेतली आणि पाणी आणण्यासाठी व सकाळी चुलाणा पेटवायला काटक्या गोळा करण्यासाठी ती दोघे बाहेर पडली.

गेक घरात एकटाच राहिला. खूप वेळ वाट पहात राहिला. मग मात्र त्याला कंटाळा आला आणि...

* * *

चुक आणि आईला जाऊन काही काळ लोटला होता. परत येताना वाटेतच त्यांच्या घसरगाडीवरच्या पाण्याने भरलेल्या बादल्या उपड्या पडल्या आणि त्यांना पुन्हा झऱ्यापर्यंत परत जावे लागले. मग अर्ध्या वाटेपर्यंत चालत आल्यावर त्यांच्या लक्षात आले की, जंगलाच्या कडेलाच चुक आपला विणलेला एक हातमोजा विसरून आला आहे. पुन्हा ते परत गेले. दरम्यान संध्याकाळचा काळोख दाटला.

अखेरीस जेव्हा ते घरी परत आले तेव्हा गेकचा कुठेच पत्ता लागेना. प्रथम त्यांना वाटले की, चुलाण्यावरच्या ओटयावरच्या मेंढकातडयांच्या ढिगामध्ये तो लपून बसला आहे; पण तिथे तो नव्हता.

मग मात्र आईला खरेच त्याची काळजी वाटू लागली. तिने दाराजवळच्या खिळयावर नजर टाकली. तिथे गेकची टोपी व कोट यांचा पत्ता नव्हता.

तिने बाहेर जाऊन सबंध घराभोवती धुंडाळले. मग ती परत आली व तिने कंदील पेटवला. अंधाऱ्या कोठीच्या खोलीत व लाकडे साठवलेल्या पडवीत तिने डोकावून पाहिले.

तिने गेकच्या नांवाने हाका मारल्या. त्याला उद्देशून ती रागारागाने ओरडली, मग गोड बोलून तिने चुचकारले. पण उलट उत्तर काही मिळेना. दरम्यान अंधार वेगाने बर्फाचे ढीग गिळून टाकीत होता.

आई वेगाने पुन्हा घरात गेली, खिळ्यावर लटकावलेली बंदूक तिने हिसकावून घेतली, काडतूसे व कंदील बरोबर घेतला आणि चुकने घराबाहेर अजिबात पाऊल टाकायचे नाही असे त्याला बजावून ती बाहेर धावली.

गेल्या चार दिवसात बर्फात अनेक पावलांचे ठसे उमटले होते. कुठून शोधायला आरंभ करावा हे तिला माहीत नव्हते, पण तिने रस्त्याच्या दिशेला जाण्याचे ठरवले, कारण एकट्याने जंगलात जायची गेकची हिंमत होणार नाही हे तिला माहीत होते.

रस्त्यावर चिटपाखरू नव्हते.

तिने बंदूक भरली व बार काढला. मग कानोसा घेऊन पाहिला. तिने दुसरा बार काढला आणि मग तिसरा बार उडवला.

अचानक जवळून कुठून तरी प्रतिसाद आला. कुणीतरी वेगाने मदतीला धावून येत होते. तिला पुढे जायची इच्छा होती, पण तिचे नमदी बूट बर्फात रुतून बसले होते. तिच्या हातातून कंदील खाली पडला. त्याची काच फुटली आणि तो विझला.



एकाएकी पहारेकऱ्याच्या झोपडीच्या व्हरांड्यामधून एक कर्णभेदक किंकाळी ऐक आली.

चुक किंचाळला होता. बंदुकीचे बार ऐकताच त्याला असे वाटले की, ज्या लांडग्यांनी गेकला खाऊन टाकले तेच आता आईवर हल्ला करीत आहेत.

आईने कंदील बाजूला फेकून दिला आणि धापा टाकीत ती घराकडे धावली. अंगात कोट न घालताच चुक बाहेर आला होता. त्याला तिने पटकन घरात ढकलले, बंदूक कोपऱ्यात फेकली, पळीभर बर्फाळ पाणी घेतले व घटघटा प्यायली.

बाहेरच्या पायऱ्यांवर पावलांचा दणदण आवाज झाला. मग दार सताड उघडले गेले. घरात वाफेचा एक लोट घुसला व धावत येणाऱ्या कुत्र्यापाठोपाठ पहारेकरीही आत आला.

"काय झालं काय? बंदूक कशाला उडवलीत?" नमस्कार-चमत्कार न करता व अंगावरचे कपडे न काढताच पहारेकऱ्याने विचारले.

"माझा मुलगा हरवलाय." आईच्या गालांवरून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. तिला पुढे बोलताच येईना.

"जरा थांबा. रडू नका," पहारेकऱ्याने दरडावणीच्या आवाजात म्हटले. "केव्हा हरवला? खूप वेळ झाला? की आत्ताच? फीअरलेस, मागं हो!" त्याने आपल्या कुत्र्याला हुकूम सोडला. "चला बाई, लौकर बोला, नाही तर मी परत निघून जाईन!"

"एक तासापूर्वी," आई उत्तरली. "आम्ही पाणी आणायला

बाहेर गेलो होतो आणि परत आलो तर तो बेपत्ता झालेला. त्यानं कोट-टोपी घातली नि तो बाहेर निघून गेला असावा."

"एका तासात तो फारसा लांब गेला नसणार आणि त्यानं जर कोट-टोपी घातलीय तर तो गारठूनही जाणार नाही. चल फीअरलेस. याचा वास घे."

पहारेकऱ्याने खुंटीवरून गेकची डोक्यावरची कुंची खेचून घेतली. मग ती कुंची व गेकचे रबरी बूट कुत्र्याच्या नाकाखाली धरले.

कुत्र्याने त्या वस्तूंचा काळजीपूर्वक वास घेतला आणि आपल्या चतुर डोळ्यांनी मालकाच्या चेहऱ्याकडे पाहिले.

"या बाजूनं चल!" पहारेकरी ओरडला व त्याने दरवाजा सताड उघडा टाकला. "जा फीअरलेस, त्याला शोधून काढ!"

पण कुत्र्याने आपली शेपूट हलवली व तो जागच्या जागीच घोटाळत राहिला.

"जा म्हणतो ना," पहारेकरी कडक आवाजात म्हणाला. "शोधून काढ त्याला फीअरलेस, शोधून काढ!"

कुत्र्याने अस्वस्थपणे नाक वर करून हवा हुंगली व फरशीवर पंजे आपटले. पण तो तिथून हलेना.

"हा काय चावटपणा चालवलाय?" पहारेकऱ्याने चिडून कुत्र्याला म्हटले. पुन्हा एकदा त्याने कुंची व रबरी बूट कुत्र्याच्या नाकाशी धरले आणि नंतर त्याच्या गळयातल्या पट्ट्याला पकडले.

पण फीअरलेस पहारेकऱ्याच्या पाठोपाठ जायला तयार होईना. तो गोल गोल फिरला आणि अखेरीस विरुद्ध दिशेला गेला.

एका भल्या मोठ्या लाकडी पेटाऱ्यापाशी तो थांबला आणि



आपल्या गुबगुबीत केसाळ पंजाने त्याने त्याचे झाकण खरवडायला सुरुवात केली. मग आपल्या मालकाकडे वळून तीनदा मोठ्यांदा आळस दिल्यासारखा भुंकला.

चकित होऊन हा सर्व प्रकार पाहणाऱ्या आईच्या हातात पहारेकऱ्याने आपली बंदूक दिली, त्या पेटाऱ्यापाशी तो गेला आणि त्याचे झाकण त्याने वर उचलले.

तिथे त्या पेटाऱ्यात, मेंढकातडींच्या व पोत्यांच्या ढिगाऱ्यावर गेक गाढ झोपला होता. आपला कोट त्याने अंगावर पांघरला होता आणि डोक्याखाली उशाला टोपी घेतली होती.

त्याला वर उचलून जेव्हा जागे केले तेव्हा त्याचे झोपाळलेले मिचमिचले. आपल्याभोवती एवढा गोंधळ का चालला आहे हेच त्याला उमजेना. आई त्याचे सारखे पटापट मुके घेत होती व रडत होती. चुक त्याच्या हातापायांना मिठ्या मारीत होता व खालीवर उड्या मारीत होता.

"हुर्रे! हुर्रे!" तो ओरडला.

केसाळ फीअरलेसच्या नाकाचा चुकने पापा घेताच तो कुत्रा लाजून बाजूला पळाला. हा गोंधळ कशाला चाललाय हे त्यालाही समजेना. त्याने आपली शेपटी हळुवारपणे हलवली व टेबलावर पडलेल्या पावाच्या तुकड्याकडे आशाळभूत नजरेने पाहू लागला.

नंतर असे समजले की, आई व चुक पाणी आणायला बाहेर गेल्यानंतर गेकला कमालीचे एकटे एकटे वाटू लागले व त्याने त्यांची गंमत करायचे ठरवले. त्याने आपली कोट-टोपी बरोबर घेतली व तो पेटाऱ्यात जाऊन लपून बसला. ते परत येईपर्यंत

तिथे बसून रहायचे आणि त्यांनी त्याला शोधायला सुरुवात केली म्हणजे पेटाऱ्यातून मोठमोठ्यांदा ओरडून त्यांना घाबरवायचे अशी त्याची मूळ कल्पना होती.

पण त्यांना यायला खूप उशीर लागला आणि पेटाऱ्यात वाट पहात पडला असतानाच गेकला त्याच्या नकळत गाढ झोप लागली.

एकाएकी पहारेकरी उठून उभा राहिला. त्याने खिशातून एक जाडजूड चावी व करकरीत बंद पाकीट टेबलावर काढून ठेवले.

"हे तुमच्यासाठी," तो म्हणाला. "आमचे प्रमुख सेर्योगिन यांच्या खोलीची आणि भांडारघराची ही किल्ली नि हे त्यांचं पत्र. चार दिवसात ते आपल्या माणसांबरोबर इथं येतील. नव्या वर्षाच्या आदल्या दिवशी."

म्हणजे हा तुसडा, आडदांड वाटणारा म्हातारा माणूस तिकडे गेला होता तर! तो म्हणाला होता की, आपल्या सापळ्यांची तपासणी करायला जायचे आहे, पण त्याऐवजी दूरवर असलेल्या अल्कराश खिंडीपर्यंत बर्फावरून घसरत तो गेला होता.

पत्र न उघडता तसेच ठेवून आई उठून उभी राहिली आणि तिने त्या म्हाताऱ्या माणसाच्या खांद्यावर कृतज्ञ तेने हात ठेवला.

पण गेकने पेटाऱ्यातील गाद्यांची उलथापालथ केल्याबद्दल आणि आईने कंदील मोडल्याबद्दल त्याने कुरकुरायला सुरुवात केली. तो बराच वेळपर्यंत रागारागाने बोलत होता. पण आता या दुर्मुखल्या म्हाताऱ्याची कुणालाच भीती वाटत नव्हती.

त्या सबंध संध्याकाळभर आई गेकला एक क्षणभरही नजरेआड होऊ देत नव्हती. जरा कुठे खुट्ट आवाज झाला की, ताबडतोब



ती त्याचा हात पकडी. जणू तो अचानक अदृश्य होईल अशी तिला भीती वाटत होती. ती त्याचे एवढे लाड करीत होती की, अखेरीस आपण पेटाऱ्यात का लपून बसलो नाही याबद्दल चुक पश्चात्ताप करू लागला आणि आईवर रागावला.

* * *

आणि आता खऱ्या गंमतीला सुरुवात झाली. दुसऱ्या दिवशी सकाळी पहारेकऱ्याने बाबांच्या खोलीचे कुलूप काढले, चांगला लाल जाळ होईपर्यंत चुलाणा पेटवला आणि त्यांच्या वस्तू आणून तिथे ठेवल्या. खोली चांगली मोठी आणि उजेडाची होती, पण तिथे कमालीची अव्यवस्था माजली होती.

आईने ताबडतोब घरसफाईला आरंभ केला. सबंध दिवसभर ती वस्तूंची या ठिकाणाहून त्या ठिकाणी हलवाहलव करीत होती, घासत होती, धूत होती, धूळ झटकीत होती.

संध्याकाळी जेव्हा पहारेकरी सर्पणासाठी काही लाकडे घेऊन आला तेव्हा उंबऱ्याशीच तो आश्चर्याने थबकला. खोली एवढी स्वच्छ चकचकीत होती की, आत पाऊल ठेवायचा त्याला धीरच होईना.

पण फीअरलेस मात्र सरळ आत आला.

त्या ताज्या घासलेल्या फरशीवरून उड्या मारीत तो गेककडे गेला आणि आपल्या थंडगार नाकाने त्याने त्याला ढोसले. "नमस्ते महाशय," जणू तो म्हणत होता, "मी तुला शोधून काढला, तेव्हा तू मला काहीतरी खायला दिलं पाहिजे."

आईने फीअरलेसला कबाबाचा एक तुकडा दिला.

त्यासरशी पहारेकऱ्याने कुरकुरायला सुरुवात केली की, तैगात जर कुत्र्यांना कबाब खायला घालायला लागले, तर नीलकण्ठ पक्षीसुद्धा उपहासाने हसतील.

तेव्हा आईने पहारेकऱ्यालाही कबाबाचा भला मोठा तुकडा कापून दिला. त्याने आभार मानले व तो बाहेर गेला. या शहरच्या माणसांच्या विचित्र वागण्याबद्दल जाता जाता स्वत:शीच तो काहीतरी पुटपुटत होता.

* * *

दुसऱ्या दिवशी त्यांनी नव्या वर्षानिमित्त घरात झाड सजवायचे ठरवले.

सजावटीसाठी त्यांनी काय वापरायचे शिल्लक ठेवले?

त्यांना सापडलेल्या जुन्या मासिकांमधली रंगीत चित्रे त्यांनी कापून काढली. बाहुल्या आणि जनावरे तयार करण्यासाठी चिंध्या आणि कापूस वापरला गेला. बाबांच्या तंबाखूच्या डबीतले कागद वापरून त्यांनी सुंदर फुले बनवली.

तो पहारेकरी जरी तुसडा आणि वागायला आडदांड असला, तरी सर्पणासाठी तिथे लाकडे आणून टाकल्यानंतर, खूप वेळपर्यंत तो दरवाजात उभा राही आणि त्यांच्या अंगच्या कसबाचे कौतुक करी. अखेरीस त्यालाही गप्प बसवेना. चहाची भुकटी गुंडाळण्यासाठी वापरतात तसला चांदीच्या वर्खाचा काही कागद त्याने त्यांना आणून दिला. तसेच त्याच्या बुटाच्या दुरुस्ती कामातून उरलेला मेणाचा एक मोठा तुकडाही त्याने आणून दिला.



मोठी गंमत आली! त्या सजावट कारखान्याचे एकदम मेणबत्त्यांच्या कारखान्यात रूपांतर झाले. त्या मेणबत्त्या काही सुबक बनल्या नव्हत्या. पण शहरच्या दुकानात मिळणाऱ्या मेणबत्त्यांसारखाच त्यांचाही उजेड तेजस्वी होता.

आता झाडाचीच तेवढी उणीव राहिली होती. आईने पहारेकऱ्याजवळ त्याची कुऱ्हाड मागितली. त्याने काही उत्तर दिले नाही, पण उठून उभा राहिला, घसरजोडे पायात चढवले आणि तो जंगलात गेला.

अर्ध्या तासात तो परत आला.

तसे तुम्ही काय पाहिजे ते म्हणा: सजावट फारशी आकर्षक नव्हती, चिंध्यांचे ससे मांजरांसारखे दिसत होते, सगळ्या बाहुल्या एकसारख्या लांबनाक्या आणि बटबटीत डोळ्यांच्या दिसत होत्या, आणि चांदीच्या कागदात गुंडाळलेली देवदाराची फळे दुकानांमधल्या काचेच्या रंगीत दिव्यांसारखी चमचमत नव्हती, असे तुम्ही म्हणू शकता. पण देवदाराचे झाड – तसे झाड अख्ख्या मॉस्कोत नव्हते! तैगामधल्या अस्सल सौंदर्याचा तो नमुना होता – उंच आणि भव्य, फांद्यांच्या टोकांना हिरवेगार चमकदार तारे!

* * *

चार दिवस कसे उलटले ते समजलेसुद्धा नाही. आणि अखेरीस नव्या वर्षाच्या आधीचा दिवस उजाडला. अगदी भल्या सकाळपासून चुक आणि गेक यांचा पाय घरात ठरेना. गारठ्याने त्यांची नाके निळीकाळी पडली, पण त्यांचे बाबा आणि त्यांच्याबरोबरची

माणसे कोणत्याही क्षणी येतील ह्या अपेक्षेने ते बाहेरच्या थंडीत हेलपाटे घालत होते. आंघोळीचे बंब तापवणाऱ्या पहारेकऱ्याने त्यांना बजावून सांगितले की, अगदी बर्फ होईपर्यंत जरी ते बाहेर वाट पहात उभे राहिले, तरी जेवणाच्या वेळेपर्यंत माणसे येणे अशक्य होते.

आणि नेमके तसेच झाले. ते टेबलाशी बसले न बसले तोच पहारेकऱ्याने खिडकीच्या तावदानावर ठोठावले. अंगात कसेबसे कोट घालून तिघेही व्हरांड्यात धावली.

"आता नीट बघा," पहारेकरी म्हणाला. "काही सेकंदातच त्या मोठ्या शिखराच्या उजव्या उतारावर तुम्हाला ते दिसतील, मग पुन्हा तँगात अदृश्य होतील आणि अर्ध्या तासाच्या आत घरात दाखल होतील."

आणि तसेच ते आले. पर्वताच्या खिंडीतून प्रथम नजरेला पडली ती कुत्रे ओढत असलेली सामानाने लादलेली घसरगाडी आणि त्यानंतर सफाईने घसरत येणारा माणसांचा थवा.

त्या भव्य पर्वताच्या पार्श्वभूमीवर ती माणसे अगदी लहान भासत होती, पण पांढऱ्याशुभ्र बर्फामुळे त्यांच्या सर्व हातापायांच्या रेषा अगदी स्पष्ट दिसत होत्या.

अजिबात झाडे नसलेल्या त्या उतारावर त्यांनी सूर मारले आणि जंगलात दिसेनासे झाले.

बरोब्बर अर्ध्या तासानंतर कुत्र्यांच्या भंकण्यांचे, लोकांच्या आरोळ्यांचे आणि बर्फावरच्या घसरपट्ट्यांचे आवाज अगदी जवळ ऐकू येऊ लागले.



घर जवळ आल्याची जाणीव होताच भुकेले कुत्रे जंगलातून सुसाट धावत आले. त्यांच्या मागून योग्य अंतर राखून नऊ माणसे बर्फावरून घसरत येत होती.

व्हरांड्यात उभ्या राहिलेल्या आईला आणि चुक-गेकला जेव्हा लोकांनी पाहिले तेव्हा त्यांनी आपल्या हातातल्या दांड्या उंचावून आनंदाने आरोळ्या ठोकल्या.

आता मात्र गेकला राहवेना आणि त्याने पायऱ्यांवरून खाली उडी मारली. त्याचे नमदी बूट बर्फात खोलवर रूतत होते तरी तो धावत त्या पथकाच्या आघाडीवर असलेल्या उंच दाढीवाल्या माणसाकडे गेला. तो माणूस इतर सर्वांपेक्षा अधिक मोठ्यांदा 'हुर्रा' म्हणून ओरडत होता.

* * *

सबंध दुपारभर त्या लोकांच्या आंघोळी, दाढ्या वगैरे स्वच्छता-कार्यक्रम चालले होते.

आणि संध्याकाळी, नव्या वर्षाच्या स्वागताच्या समारंभासाठी ते सर्व एकत्र जमले.

टेबल सजवण्यात आले. दिवा मालवण्यात आला व मेणबत्त्या पेटवण्यात आल्या. पण चुक आणि गेक यांचा अपवाद वगळता ते सर्व वयाने मोठे असल्याने, त्यानंतर काय करावे ते त्यांना समजेना.

पण त्या माणसांपैकी एकाजवळ ॲकॉर्डियन होते ही त्यातल्या त्यात चांगली गोष्ट होती. त्याने ते आणले व छानदार वॉल्तझ्

संगीत वाजवले. सगळ्यांनी उड्या मारल्या व नाचायला सुरुवात केली. आणि ते सारे सुरेख नाचले – विशेषतः आईबरोबर नाचताना!

पण बाबांना मात्र नाचायचे कसे ते माहीत नव्हते. ते एवढे धिप्पाड उंच होते की, नाचणे तर सोडाच, त्यांनी नुसत्या फेऱ्या घातल्या असत्या तरी कपाटातले काचेचे सामान खाली कोसळले असते.

चुक आणि गेकला आपल्या मांड्यावर घेऊन बाबा बसले होते व प्रत्येकाच्या नाचाला जोराने टाळ्या वाजवीत होते.

लौकरच नाचाचा कार्यक्रम संपला. गेकला एक गाणे म्हणायला सांगण्यात आले.

गेकची त्यासाठी खुशामत करावी लागत नसे. आपल्याला गाता येते हे त्याला माहीत होते आणि त्याचा त्याला अभिमान होता.

ॲकॉर्डियन वाजवणाऱ्या माणसाने त्याला साथ धरली. त्याने कोणते गाणे म्हटले ते मात्र मला आता आठवत नाही. पण एवढे मात्र आठवते की, ते खूप छान गाणे होते, कारण तो गात असताना सारे अगदी शांत बसले होते. मध्ये श्वास घ्यायला तो थांबे तेव्हा मेणबत्त्यांच्या ज्योतींची फडफड आणि बाहेर घोंघावणाऱ्या वाऱ्यांचा आवाज स्पष्ट ऐकू येत होता.

आणि जेव्हा गेकने गाणे संपवले तेव्हा सर्वांनी टाळ्या वाजवायला आणि ओरडायला सुरुवात केली. त्यांनी गेकला पकडले आणि त्याला हवेत उडवायची त्यांची इच्छा होती. पण आईने चटकन त्याला आपल्या पोटाशी धरले, कारण आनंदाच्या



भरात ते त्याला छतापर्यंत उंच फेकतील व त्याला दुखापत होईल, अशी तिला भीती वाटली.

"आता सारेजण खाली बसा," मनगटावरच्या घड्याळाकडे पहात बाबा म्हणाले. "मुख्य कार्यक्रम अजून सुरू व्हायचाय." त्यांनी रेडिओचे बटण दाबले.

सारे खाली बसले व गप्प झाले.

प्रथम कमालीची शांतता होती. मग त्यांना मोटारींच्या कर्ण्यांचे आवाज ऐकू आले. मग थोडी खरखर आणि घरघर आणि नंतर दूरवरून मधुर टिणटिण ऐकू आली.

लहान-मोठ्या घंटांचा मिळून एक मधुर नाद उमटत होता:

टीर-लिल ऽ लिली-डाँग!

टीर-लिल ऽऽ लिली डाँग!

चुक आणि गेकने एकमेकांकडे पाहिले. तो कसला आवाज आहे ते त्यांना माहीत होते. अतिदूरच्या मॉस्कोमध्ये, स्पास्की मनोऱ्यांवरच्या लाल ताऱ्याखालील क्रेमलिनच्या सोनेरी घंटा वाजत होत्या.

आणि तो घंटानाद – नववर्षाच्या आरंभी – सगळीकडच्या लोकांनी ऐकला. शहरातल्या, डोंगरकडेच्या, स्तेपमधल्या, तैगातल्या आणि अगदी निळ्या सागरांवरच्या लोकांनी सुद्धा!

आणि अर्थात, त्या लष्करी आगगाडीच्या जवळच्या स्वतःच्या विचारात गढलेल्या सेनापतीनेही तो घंटानाद ऐकला.

सारे उभे राहिले. प्रत्येकाने एकमेकाला नव्या वर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या. आणि खूप खूप सुख लाभो असे म्हटले!

प्रत्येकाने सुखाचा अर्थ आपापल्या परीने घेतला. पण त्या सर्वांना माहीत होते आणि समजले होते की, त्यांनी सन्मानाने जगले पाहिजे, खूप कष्ट केले पाहिजेत व सोविएत संघ असे नांव धारण करणाऱ्या त्या अफाट, समृद्ध भूमीवर खूप प्रेम करून तिचे रक्षण केले पाहिजे.

---

**वाचकांना विनंती**

'प्रगती प्रकाशना'ला या पुस्तकाच्या अनुवादाबाबत व रचनेबाबत आपले मत जाणून घ्यायला आनंद वाटेल. आपल्या इतर सूचनांचाही अवश्य विचार केला जाईल. कृपया पुढील पत्त्यावर पत्रव्यवहार करा :

प्रगती प्रकाशन,<br>
१७, झुबोव्स्की बुलेवार्द,<br>
मॉस्को, सोविएत संघ.

ASTER AMEET VIJAY JOSHI.